# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

टेलि. : २४०१०४३७
२४०२०७८१
२४०१४७०१
फॅक्स : २४०२ ४०६८
Visit us at : http://mpcb.mah.nic.in

कल्पतरू पॉईंट, २/३/४ था माळा,
सिने प्लॅनेटसमोर,
सायन सर्कल जवळ, सायन (पूर्व),
मुंबई - ४०० ०२२.


माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत गठीत करण्यात आलेल्या
ऍपेलेट ऑथॉरिटीसमोर

अपिल क्रमांक १७/२०१२

सुनावणी दिनांक २१/०२/२०१२

श्री किशोर बापूराव टाकणे
सह्याद्री को.ऑप.हौ.सोसायटी,
बी.नं.सी-२, रुम नं.२/३, ८ बी,
सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४ — अपिल करणार

विरुध्द

माहिती अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
मुंबई — प्रतिवादी

## आदेश

**अपील करणार यांनी** २००९ पासून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून खालीलप्रमाणे माहिती मागितलेली होती.

मुद्दा क्रमांक - १ त्यांच्याकडून मा. पंतप्रधान कार्यालयाकडून महाराष्ट्र राज्याच्या राज्यपाल महोदयांकडून, महाराष्ट्र शासनाच्या विविध मंत्री महोदयांकडून, केंद्रीय पर्यावरण विभागाकडून, पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडून राज्य माहिती आयोगाकडून, बेलापूर पोलीस स्टेशनकडून प्राप्त झालेली पत्रे, तक्रारी, आदेश इत्यादी बाबतची माहिती, त्यासोबत म.प्र.नि.मंडळाच्या नोंदवहीमध्ये झालेल्या संबंधीत नोंदी व क्रमांक, त्यांनी जोडलेल्या तक्त्यातील दोन रकान्यांमध्ये दिलेल्या माहितीप्रमाणे पुढील रकान्यात विचारण्यात आलेली त्या पत्र, तक्रारी, आदेश इत्यादीबाबतची माहिती त्यांनी जोडलेल्या तक्त्यामध्ये मागितलेली होती.

प्रत मिळाली
२१/०२/१२

मुद्दा क्रमांक १, ४, ५, ६ , ७ व ८ बाबत आस्थापनाशाखेने जनमाहिती अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, मुंबई यांना दिनाक १०/०२/२०१२ रोजीच्या पत्राद्वारे माहिती उपलब्ध करुन

दिलेली आढळते. सदरहू माहिती ही जनमाहिती अधिकारी यांनी आजच्या सुनावणीच्या रोजी अपील करणार यांना उपलब्ध करुन दिली. अपील करणार यांनी सदरहू पत्राची प्रत प्राप्त झाल्याचे मान्य केले. सदरहू माहितीबाबत अपील करणार यांनी खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित केले.

मुद्दा क्रमांक १ - मुद्दा क्रमांक १ बाबत लेखा अधिकारी (आस्थापना) यांनी दिनांक १०/०२/२०१२ च्या पत्राद्वारे असे स्पष्ट कळविलेले आहे की, माहिती अधिकार अधिनियम २००५, प्रकरण १ मधील क्रमांक ३ (च) नुसार मुद्दा क्रमांक १ बाबत मागितलेली माहिती तक्त्याच्या स्वरुपात लेखीरित्या भरुन देणे शक्य नाही. सदरबाबतची नस्ती आस्थापना शाखेत उपलब्ध असून, आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती अर्जदारास उपलब्ध करुन देता येतील. त्याचा खर्च प्रतीपृष्ठ रु. २+ टपाल खर्च अर्जदाराकडून वसुल करणे आवश्यक आहे.

अपील करणार यास वरीलप्रमाणे नस्तीतून आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती घेण्याबाबत विचारले असता, त्यांनी अशा प्रती घेण्यामध्ये त्यांना कोणताही अडथळा नसून त्यास त्यांची संमती असल्याचे मान्य केले. मात्र वरील माहिती विहित ३० दिवसांत अपील करणार यांना उपलब्ध करुन देता न आल्यामुळे त्याबाबतचा कोणताही खर्च अपील करणार यांच्याकडून वसुल करता येणार नाही. मुद्दा क्रमांक १ मधील काही ठराविक माहिती ही विधी व योजना विभागाशी संबंधीत असल्यामुळे दिनांक २७/०१/२०१२ च्या जावक क्रमांकानुसार तयार ठेवण्यात आली होती व त्याप्रमाणे अपील करणार यांना दिनांक २७/०१/२०१२ च्या जनमाहिती अधिकारी, मुख्यालय यांच्या पत्रानुसार प्रत्यक्ष घेऊन जाण्याबाबत कळविण्यात आले होते. मात्र त्यानंतर अपील करणार हे प्रत्यक्ष माहिती घेण्याकरिता न आल्यामुळे सदरहू माहिती आज दिनांक २१/०२/२०१२ रोजी अपीलाच्या सुनावणीच्या वेळी अपील करणार यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्याबाबत अपील करणार यांना कोणताही आक्षेप नसून, ती माहिती त्यांना मिळाल्याचे त्यांनी मान्य केलेले आहे.

मुद्दा क्रमांक २:- तसेच पोलीस आयुक्त, नवी मुंबई कार्यालयाकडून दिनांक ०८/०९/२०१० अन्वये म. प्र. नि. मंडळाचे अध्यक्ष यांना श्री. शि. रा. बानाटे, वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांची खातेनिहाय चौकशी करण्याकरिता पाठविलेले पत्र, त्या अनुषंगाने करण्यात आलेली कार्यवाही कोणी केली, त्याबाबत विस्तृत माहिती, कार्यवाही झाली असल्यास, त्याबाबतचा निर्णय याबाबतची संपूर्ण माहिती जोडपत्रासहीत साक्षांकित करुन मागितलेली होती.

सदरहू बाबतीत आस्थापनाशाखेकडून असे स्पष्ट करण्यात आले की, तत्कालिन मा. अध्यक्ष महोदया यांना दिनांक ०८/०९/२०१० च्या पत्राद्वारे, पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई यांनी वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांच्या खातेनिहाय चौकशीबाबत पाठविलेले पत्र आस्थापनाशाखेत उपलब्ध असल्याचे स्पष्ट करण्यात आले. सदरहू माहिती ८ दिवसांच्या आत उपलब्ध करुन देण्यात येईल, असे कार्यालय अधीक्षक यांनी स्पष्ट केले. त्याप्रमाणे अपील करणार यांना सदरहू माहिती ८ दिवसांत उपलब्ध करुन दयावी.

मुद्दा क्रमांक ३ :- मुद्दा क्रमांक ३ मध्ये वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांच्यावर करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती, दस्ताऐवज साक्षांकित करुन किंवा कार्यवाही झाली नसल्यास कार्यवाही का करण्यात आली नाही, याबाबतची माहिती दस्ताऐवजांसह साक्षांकित करुन मागितली होती. सदरहू बाबतीत जनमाहिती अधिकारी, मुख्यालय यांनी दिनांक २७/०१/२०१२ च्या पत्राद्वारे आज रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आढळते. त्याबाबत अपील करणार यांना कोणताही आक्षेप नसून, ती माहिती त्यांना मिळाल्याचे त्यांनी मान्य केलेले आहे. मात्र श्री. अजित सराफ यांचे चौकशी अधिकारी म्हणून नेमणूकीचे आदेश व तत्संबंधी इतर माहिती उपलब्ध नसल्याचे अपील करणार यांनी सुनावणीच्या दरम्यान निदर्शनास आणले. सदरहू बाबतीत विधी विभागाकडे प्राप्त असलेल्या धारिकेमधील टिप्पणी संबंधातील भाग छायांकित करुन अपील करणार यांना सुनावणीच्या वेळी उपलब्ध करुन देत असल्याचे सहायक माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केले.

मुद्दा क्रमांक ४, ५, ६, ७ व ८ :- अपील करणार यांना सदरहू माहिती सुनावणीच्या वेळी उपलब्ध करुन देण्यात आली. त्यामधील मुद्दा क्रमांक ४ ते ७ बाबत अपील करणार यांना कोणताही आक्षेप नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मात्र मुद्दा क्रमांक ८ मधील उपोषण करण्याबाबत मंडळातील कोणत्या प्राधिका-यास नोटीस देण्यात यावी, त्याची विस्तृत माहिती, माहिती अधिकारी यांनी साक्षांकित करुन देण्यात यावी तसेच अशी नोटीस किती दिवस अगोदर देणे आवश्यक राहील, याचीही माहिती अपील करणार यांनी मागितलेली आढळते.

त्याबाबत लेखा अधिकारी (आस्थापना) यांनी विधी विभागाने अशी माहिती देणे इष्ठ होईल असे त्यांच्या उत्तरामध्ये स्पष्ट केले आहे. त्याबाबत असे स्पष्ट करण्यात येते की, उपोषण कोठे करावयाचे व केव्हा करावयाचे हे निश्चित झाल्यानंतर तशाप्रकारची नोटीस संबंधीत कार्यालयाच्या विभागप्रमुखास देणे इष्ठ असून, त्यामध्ये संबंधीत कार्यालयाकडून म्हणजेच विभागप्रमुखाकडून योग्य ती परवानगी मिळाल्यानंतरच असे उपोषण करता येईल, असे स्पष्ट करण्यात आले.

येणेप्रमाणे अपील निकाली काढण्यात येत आहे.

दिनांक २१/०२/२०१२ रोजी मुंबई येथून.

( द. त्रि. देवळे )
अपिलीय अधिकारी